# बिबट्यांच्या सहवासात



बिबट्या हा संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा अविभाज्य घटक आहे. बिबटे मानव निर्मित हद्दी व नकाशे कधीच मानत नाही. बिबटे ब-याचदा मानवनिर्मित हद्दीच्या बाहेर सुध्दा संचार करतात व ते ही निव्वळ भक्ष्यासाठी, असा संचार करताना त्यांच्याकडून कुणालाही ईजा झालेली नसताना सुध्दा असा संचार मानवास फार धोकादायक वाटतो. असे प्रश्न सोडविण्यासाठी बिबट्यांना व उद्यान प्रशासनास आपल्या मदतीची आवश्यकता आहे.

## बिबट्यांचे वावर असलेल्या परिसरात वेग मर्यादेचे पालन करा


आरे मध्ये भरधाव वाहनामुळे झालेल्या बिबट्याच्या पिल्लाचा मृत्यु

आपले वाहन बिबट्यांचा वावर असलेल्या भागातून धावत असेल, तर आपल्या वाहनाची वेग मर्यादा २० कि.मी./तास असणे आवश्यक आहे. अशी वेग मर्यादा पाळल्यामूळे आपणास बिबट्याचे दर्शन सुद्धा घडू शकते. अशा ठिकाणी २० कि.मी./तास वाहन वेग मर्यादेचे परावर्तीत फलक लावणे आवश्यक आहे.



## बिबट्या-मानव संघर्षाच्या वाढीची कारणे

- **बिबट्यास घेराव घालणे**
  घेरावातून स्वत:ची सुटका करुन घेण्यासाठी बिबट्या एखादद्यावर हल्ला करु शकतो. बिबट्या नेहमीच मानवापासून दूर राहण्याचा प्रयत्न करतो. बिबट्या नेहमीच माणसाच्या जवळ जाणे टाळतो. परंतू स्वसंरक्षणासाठी, घेराव घातलेल्या माणसांवर हल्ला करु शकतो. म्हणूनच मानव वस्तीत शिरलेल्या बिबट्यास कधीच घेराव घालू नये व त्यास निघून जाण्यासाठी मार्ग मोकळा करुन दद्यावा.

- **जेरबंद पिंजरा लावण्यासाठी वनविभागावर दबाव आणणे**
  बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावण्याबाबत नागरिकांकडून नेहमीच दबाव आणला जातो. वास्तविक, एखादद्या विशिष्ट क्षेत्रातील बिबट्या जेरबंद केला तर त्या रिकाम्या क्षेत्राची जागा एक अथवा अधिक बिबट्यांच्या स्थलांतराने भरली जाते. शेकडो किलोमीटर्स अविरतपणे प्रवास करुन असे रिकामे क्षेत्र भरले जाते, जसे 'आजोबा' ह्या बिबट्याने केले. याबाबतीत नागरिकांचे प्रबोधन होणे जरुरी आहे. मादी सुरुवातीच्या दोन ते तीन वर्षात आपल्या पिल्लांना शिकार करणे, मानवापासनू दूर राहणे आणि स्वता:चे अस्तित्व राखणे इत्यादी बाबत मार्गदर्शन करत असते. अशी मादी जर जेरबंद करुन पिल्लांपासून दूर नेली तर मागे राहीलेल्या पिल्लांपासून मानवजातीस जास्त धोका निर्माण होतो. म्हणूनच एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील मानवावर हल्ला न करणारा बिबट्या त्याच क्षेत्रात राहू देणे मानवाच्या हिताचे आहे. कुठलाही बिबट्या चिथावणी शिवाय मानवावर हल्ला करत नाही.

- **शिका-याकडनू होणारी बिबट्यांची हत्या**
  जर बिबट्यांची शिकार केली गेली अथवा ते जखमी झाले तर त्यांच्या पासून दुरावलेल्या पिल्लांमुळे वर नमूद केल्या प्रमाणे मानवास विपरित परिणामांना सामोरे जावे लागेल.

## बिबट्या पासून धोका कमी करण्यासाठी आचरणात आणण्याच्या काही बाबी

☑ सदर क्षेत्रात बिबट्यांचे वास्तव्य आहे आणि बिबट्यांचे केवळ दर्शन हा काही धोका नाही याचे भान असणे जरुरी आहे.

☑ मानव निर्मित वनांचे नकाशे, राष्ट्रीय उद्यानांची हद्द, मानवी वसाहत इत्यादींची बिबट्यास ओळख नसते. तथापि, ते मानवापासून अलिप्त राहण्याबाबत संवेदनशील असतात. वास्तविक ते शक्यतो मानवांचा संपर्क टाळणेच पसंत करतात.

☑ रात्री बिबटे कार्यरत होत असल्याने नागरिकांनी सुध्दा सावध राहणे आवश्यक आहे. विशेषत: लहान मुले घराबाहेर असतील तेव्हा अशा मुलांवर मोठयांनी लक्ष ठेवणे आवश्यक आहे. रात्रीच्या वेळी घराबाहेर असताना भ्रमणध्वनीवर संगीत चालू ठेवावे जेणेकरुन बिबट्या तुमच्या मार्गात येणार नाही.

☑ रात्रीच्या वेळी बाहेर एकटे फिरु नये. रात्री बाहेर फिरताना सोबती असणे आवश्यक आहे. अशाने बिबट्याच्या हल्ल्याची शक्यता कमी होते.

☑ समजा बिबट्या दिसलाच तर त्यास निघून जाण्यासाठी मार्ग मोकळा करुन दद्यावा. अशावेळी कुठलाही आक्रमक पवित्रा घेऊ नये, जेणेकरुन आपल्या जीवितास धोका निर्माण होईल.

☑ समजा बिबट्या आपल्या भागात दिसलाच तर त्याच्या भोवती जमाव करु नये. जमलेल्या गर्दीने बिबट्या घाबरुन बाहेर पडण्याच्या प्रयत्नात एखादयाला इजा पोहचवू शकतो. अशावेळी जमाव व बिबट्यामध्ये परस्पर समन्वयाची भूमिका वनविभाग बजावत असते. तथापि अशावेळी जमाव व बिबट्याच्या हालचालींवर नियंत्रण ठेवणे कठीण होते. तेव्हा आपल्या समजूतदारपणाची गरज आहे.

☑ बिबट्याने आपल्या वसाहतीत अथवा आसपास येऊ नये यासाठी आपल्या घरातील कच-याची योग्य रितीने विल्हेवाट लावावी, जेणेकरुन मोकाट कुत्रे आसपास फिरकणार नाहीत. तसेच आपल्या वसाहतीतील श्वानगृहे घरापासून दूर अंतरावर असावीत, कारण बिबटे भुंकणा-या कुत्र्याकडे सुमारे ४०० मी. अंतरावरुन सुध्दा आकर्षित होतात.

☑ बिबटे मानवनिर्मित उद्यानहद्दी ओळखत नसल्याने ते उद्यानहद्दीच्या बाहेर येतात. अशावेळी ते उद्यानाच्या बाहेर आकर्षिले जाणार नाहीत याची काळजी घेणे जरुरी आहे. वसाहतीमधील कच-याची विल्हेवाट योग्य रितीने व वेळीच लावली जावी यासाठी महानगर पालिकेने जास्तीत जास्त काळजी घेणे जरुरी आहे, जेणेकरुन वसाहतीत केरकचरा साठणार नाही व अशा केरकच-याच्या ठिकाणी मोकाट कुत्रे व डुक्कर जमा होणार नाहीत.

## आपत्कालीन दुरध्वनी क्रमांक

कायदा-सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने जवळच्या स्थानिक पोलिस ठाण्यास दुरध्वनी करावा तथा पोलिस नियंत्रण कक्षास क्र.१०० वर दुरध्वनी करावा. तसेच, स्थानिक अग्निशामक केंद्रास दुरध्वनी करावा तथा अग्निशामक दलाच्या नियंत्रण कक्षास क्र. १०१ वर दुरध्वनी करावा. वस्तीत आलेल्या बिबट्यास जमावाने गराडा घातलेला असतो, अशा जमावास पांगविण्यासाठी पोलिसांची मदत होते.

| | |
|---|---|
| **नियंत्रण कक्ष** | : १००, ०२२-२२६२१८५५,०२२-२२६२१९८३,०२२-२२६२५०२० |
| **बोरीवली** | : ०२२-२८९०६६०६, ०२२-२८९३०१४५ |
| **आरे** | : ०२२-२९२७२४८४, ०२२-२९२७२४९४ |
| **दिंडोशी** | : ०२२-२८७८६३००, ०२२-२४६९१२०५ |

एखाद्या बिबट्यास जमावाने घेराव घातला असता किंवा बिबट्याने एखाद्या व्यक्तीवर हल्ला केला असता खालील दुरध्वनीवर संपर्क साधावा:

| | |
|---|---|
| **संजय गांधी राष्ट्रीय उद्यान नियंत्रण कक्ष** | : ०२२-२८८६६४४९. |
| **ठाणे वनविभाग नियंत्रण कक्ष** | : ०२२-२५४४५४५९. |

उपरोक्त क्रमांकाव्यतिरीक्त खालील स्वयंसेवकाच्या भ्रमणध्वनीवर सुध्दा अधिक माहितीसाठी संपर्क साधता येऊ शकेल.

| नाव | ठिकाण | क्रमांक |
|---|---|---|
| राजेश सानप | आरे, गोरेगाव (पू) | ९६६४९८७५४१ |
| सोनू सिंग | मुलूंड दर्शन | ९८३३६७८८२८ |
| योगेश बंड | बोरीवली (पू) | ८०९७५८२५१९ |

MUMBAIKARS FOR SGNP

CENTRE FOR WILDLIFE STUDIES

www.mumbaikarsforsgnp.com    www.cwsindia.org

Email: mumbaikarsforsgnp@gmail.com